## उपाय योजना

- गोठा नेहमी हवेशीर व स्वच्छ ठेवावा. जेणेकरुन कीटकांचा प्रादुर्भाव वाढणार नाही.
- गोठ्यात डास माश्यांच्या नियंत्रणासाठी निरगुडी, सुकेशेण व कडुलिंब पाला यांचा धूर करावा.
- कापूर, करंजतेल, कडूलिंबाचे तेल, १% फॉर्मलिन, २ ते ३% सोडिम हायपोक्लोराईड किंवा २% फिनाईलची फवारणी करावी.



- जनावरांच्या अंगावर निंब तेल,करंज तेल लावल्यास डास, माशी चावत नाहीत.
- गोचिड नियंत्रणासाठी औषध फवारणी करावी किंवा १ मिली प्रती ५० किलो जनावाराचे वजन प्रमाणे आयव्हर मेक्टीन इंजेक्शन कातडीखाली द्यावे.
- बाधित/निरोगी जनावरांना एकत्र चारा पाणी अथवा चरायला सोडू नये. आजारी व निरोगी जनावरे संपर्कात येऊ देऊ नये.
- बाधित जनावरे निरोगी जनावरापासून किमान एक महिना वेगळी ठेवावीत.
- चराऊ कुरणावर जनावरे एकत्रित चरावयास सोडू नये. सार्वजनिक ठिकाणी पाणी पाजू नये.
- बाहेरील/बाजारातील जनावरे गावात अथवा गोठ्यात आणू नयेत.

## लसीकरण व उपचार




- प्रतिबंधात्मक उपाय म्हणून लसीकरण करुन घ्यावे. लसीकरण चार महिने व त्यावरील वयाच्या सर्व गाई-म्हैस वर्गीय जनावरांना करावे. कमी तीव्रतेची लम्पी स्कीन रोगाची लस शेळी-मेंढीची देवी रोगाची लस पशुवैद्यका कडून करुन घ्यावी.
- आजाराची लक्षणे दाखविणाऱ्या जनावरास तात्काळ पशुतज्ञाकडून उपचार करुन घ्यावेत.
- ज्वरनाशक, सूज कमी करणारे व वेदनाशमक औषध टोचून द्यावे.
- जीवाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिजैविकांचा वापर करावा.
- प्रतिकार क्षमता वाढविण्यासाठी उपचार करावेत.
- जनावरांच्या शरीरावर झालेल्या जखमा २% पोटॅशिअम परमँगनेटच्या पाण्याने धुऊन त्यावर बोरोग्लिसरीन लावावे.

लम्पी रोगाबाबत मोठ्या प्रमाणावर जाणीव जागृती करण्याचे कार्य कृषि विज्ञान केंद्र सोलापूर मार्फत सुरु असून या रोगामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी रोग होऊ नये म्हणून काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे.


लेखक

डॉ. प्रकाश व्हि. कदम
विषय विशेषज्ञ (पशुवैद्यक शास्त्र)

डॉ. लालासाहेब रा. तांबडे
प्रमुख तथा वरिष्ठ शास्त्रज्ञ




तांत्रिक सहाय्य - महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपूर

| प्रकाशन वर्ष | घडी पुस्तिका | एकूण प्रकाशन | प्रति | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|
| सप्टेंबर २०२२ | क्र. ७६ | क्र. ९४ | २००० | रु. ११८०० |


### जनावरांसाठी घातक

# लम्पी त्वचा रोग




संपादक व प्रकाशक
डॉ. लालासाहेब रा. तांबडे
प्रमुख तथा वरिष्ठ शास्त्रज्ञ



शबरी कृषी प्रतिष्ठान संचलित

**कृषि विज्ञान केंद्र, सोलापूर**

गट नं. २२/१ ब, सोलापूर-बार्शी रोड, मु. खेड, पोस्ट-केगांव,
ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर (महाराष्ट्र) फोन : ०२१७- २९९०५६३
visit us at : www.kvksolapur.org

## जनावरांसाठी घातक लम्पी त्वचा रोग

लम्पी स्किन (त्वचा) रोग असून विषाणूमुळे होणारा साथीचा आजार आहे. याचा प्रादुर्भाव सर्व वयोगटातील गाई-म्हशी मध्ये आढळतो व तो मोठ्या प्रमाणात पसरतो. गाई मध्ये याचे प्रमाण म्हशी पेक्षा जास्त दिसते. प्रौढ जनावरापेक्षा लहान वासरामध्ये याचे प्रमाण जास्त असते. शेळ्या-मेंढ्यामध्ये हा आजार आढळत नाही. या रोगामुळे मरतुकीचे प्रमाण कमी आहे परंतू जनावर अशक्त होते. जनावराची त्वाचा कायम स्वरूपी डागाळलेली खराब होते व बाजारमूल्य कमी होते. दूध उत्पादन घटते व बैलांच्या कार्य क्षमतेवर परिणाम होतो.

लम्पी स्किन आजार सन १९२९ ते १९७८ पर्यंत दक्षिण व पूर्व आफ्रिकेमध्ये दिसून येत होता. सन २००० मध्ये तो मध्य-पूर्वेतील देश, त्यानंतर २०१३ मध्ये तुर्की येथे आढळला. अलीकडेच तो रशिया, चायना, बांग्लादेश व आता भारतात पसरताना दिसत आहे. भारतात या रोगाची नोंद ओरिसा राज्यात ऑगस्ट २०१९ रोजी झाली. महाराष्ट्रातील बऱ्याच जिल्ह्यामध्ये याची लागण झाली आहे. सोलापूर जिल्ह्यातील जनावरामध्ये या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे, त्यामुळे सदरील रोगाचे शास्त्रशुद्ध पद्धतीने व्यवस्थापन आणि लसीकरण राबविणे क्रमप्राप्त झाले आहे.



## रोग लक्षणे

- बाधित जनावरे २ ते ४ आठवडे बाह्य लक्षणे दाखवत नाहीत.
- जनावरास तीव्र स्वरुपाचा ताप (१०४ ते १०५° फॅरनहाईट) येतो. डोळ्यातून व नाकातून स्त्राव वाहतो. भूक-तहान कमी होते.
- डोळे, मान, पाय, छाती, पाठ, मायांग व कासेवर १० ते ३० मि.मी. व्यासाच्या गाठी येतात. तोंडात, नाकात व डोळ्यात व्रण उठतात.
- तोंडातील व्रणामुळे जनावरास चारा खाण्यास व रवंथ करण्यास त्रास होतो.
- अंगावरील गाठी पुटून जखमा होतात.
- डोळ्यातील व्रणामुळे चिपडे येऊन पापण्या एकमेकांना चिकटून दृष्टी बाधित होते.
- दूध उत्पादन कमी होते अथवा पूर्ण बंद होते.
- गाभण जनावरे बाधित झाल्यास गाभडण्याची शक्यता असते.
- फुफ्फुसाच्या दाहामुळे व श्वसनास अडथळा होऊन मृत्यू होऊ शकतो.
- पायावर सूज येते. जनावरे लंगडतात.



## लम्पी त्वचा रोगाचा प्रसार




- या रोगाचा प्रसार डास, गोचिड, माशा, कीटक, चिलटे यांच्या मार्फत होतो.
- निरोगी जनावर बाधित जनावराच्या संपर्कात आल्याने याचा प्रादुर्भाव होतो.
- बाधित जनावराच्या अश्रू, नाकातील स्त्राव व वीर्यामध्ये रोगाचे विषाणू आढळून येतात. हे विषाणू पाणी-चाऱ्या मध्ये मिसळल्याने सुद्धा प्रसार होतो.
- बाधित जनावरांचा चारा-पाणी दूषित होऊन इतर निरोगी जनावरांमध्ये याचा प्रसार होतो.
- बाधित जनावरांच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींच्या अंगावरून, कपड्यावरून याचा प्रसार इतर निरोगी जनावरांना होऊ शकतो.
- उष्ण व दमट हवामानात कीटकांची वाढ झपाट्याने होते व या काळात रोगाचा प्रसार मोठ्या प्रमाणात होतो.
- बाधित नराच्या वीर्यामुळे मादीला व नवजात वासरांना संक्रमण होऊ शकते.
- दूध पीणाऱ्या वासरास बाधित गाईच्या दुधातून कासेवरील जखमामुळे लागत होऊ शकते.